वाचले :-
१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक : ०७ मे, २०२१
२. पदोन्नती समिती सभा दि.०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत.
३. मा.आयुक्त सो यांचा दिनांक : ०८ /१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/२/कावि/६७६/२०२४
दिनांक : ०८ /१०/२०२४

**विषय :- 'असिस्टंट मेट्रन' पदावरील पदोन्नती बाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर **'असिस्टंट मेट्रन'** अभिनामाची पदे **पे.लेवल S-१५ वेतनश्रेणी ४१८००-१३२३००** या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. यापैकी रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार सिस्टर इनचार्ज या निकटतम निम्न पदावरील शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ मधील मार्गदर्शक तरतुदींनुसार खालील कर्मचा-यांना मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधिन **'असिस्टंट मेट्रन'** अभिनामाच्या रिक्त पदावर **पे.लेवल S-१५ वेतनश्रेणी ४१८००-१३२३००** मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत सदरची समिती सर्वानुमते शिफारस केलेली आहे.

| **अ.क्र** | **स्टाफ नर्स पदाची दिनांक ३१/१२/२००० अखेरची अंतिम स्वरुपाची सेवाज्येष्ठता तसेच दिनांक २५/०५/२००४ रोजीची स्थिती दर्शविणारा क्रम** | **अधिकारी नावं** | **पदोन्नतीचा प्रवर्ग** | **पदोन्नतीने द्यावयाचा नेमणूकीचा विभाग** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ५६ | कुलकर्णी स्वाती नरेंद्र | ज्येष्ठतेनुसार | वैद्यकीय |
| २ | ५८ | कांबळे पंचशिला अरुण | ज्येष्ठतेनुसार | वैद्यकीय |
| ३ | ५९ | गायकवाड किरण अविनाश | ज्येष्ठतेनुसार | वैद्यकीय |
| ४ | ६० | शेफर्ड जेनीफर सॅमसन | ज्येष्ठतेनुसार | वैद्यकीय |
| ५ | ६१ | भोसले सुवर्णलता संपत | ज्येष्ठतेनुसार | वैद्यकीय |

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधिन राहून उपरोक्त नमूद अधिकारी यांना **'असिस्टंट मेट्रन'** या पदावर **पे.लेवल S-१५ वेतनश्रेणी ४१८००-१३२३००** या वेतनश्रेणीमध्ये निव्वळ तात्पुरत्या ज्येष्ठतेनुसार आदेशाचे दिनांकापासून पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.५ मध्ये नमूद केलेल्या विभागामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत असून संबंधित विभागप्रमुख यांनी उपरोक्त कर्मचारी यांना सविस्तर कामकाजाचे आदेश द्यावेत.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

*सही/-*
*(शेखर सिंह)*
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित अधिकारी
प्रत-

| | |
|---|---|
| १) लेखा विभाग | २) लेखापरिक्षण |
| ३) सर्व संबंधित विभाग | ४) प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४,संगणक कक्ष |

सहा. आयुक्त, (साप्रवि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,